# १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, रायगड पदभरती जाहीरात

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध कार्यक्रमांतर्गत मंजूर असलेली पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यांच्या कालावधी करीता खाली नमूद केलेल्या अटी व शर्ती च्या अधीन राहून पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यानुसार रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ. क्र | पदाचे नाव | रिक्त पदे | प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन | थेट मुलाखत दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | MBBS (MO)<br>वैद्यकीय अधिकारी | १) महानगरपालिका पनवेल - ६<br>२) नगरपरिषद खोपोली - ५<br>३) नगरपरिषद अलिबाग - ०१<br>४) नगरपरिषद महाड - ०२<br>५) नगरपरिषद रोहा - ०२<br>६) नगरपरिषद श्रीवर्धन - ०२<br>७) नगरपरिषद कर्जत - ०२<br>८) नगरपरिषद पेण - ०२<br>९) नगरपरिषद माथेरान - ०१<br>१०) नगरपरिषद मुरुड - ०१<br>११) नगरपरिषद उरण - ०२<br>१२) नगरपंचायत तळा - ०१<br>१३) नगरपंचायत खालापूर - ०१<br>१४) नगरपंचायत माणगांव - ०१<br>१५)नगरपंचायत पोलादपूर - ०१<br>१६) नगरपंचायत म्हसळा - ०१<br>**Total-31** | SC- 4<br>ST- 3<br>VJ-(A)- 1<br>NT (B)- 1<br>NT (C)- 1<br>NT-(D)- 1<br>OBC- 6<br>EWS- 3<br>OPEN- 11<br>**Total -31** | MBBS with MMC Registration | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | रु. ६०,०००/- प्रति माह | दि. १०/०८/२०२२ |
| 02 | अधिपरीचारीका (Staff Nurse) (महिला) | १) महानगरपालिका पनवेल - ६<br>२) नगरपरिषद खोपोली - ५<br>३) नगरपरिषद अलिबाग - ०१<br>४) नगरपरिषद महाड - ०२<br>५) नगरपरिषद रोहा - ०२<br>६) नगरपरिषद श्रीवर्धन - ०२<br>७) नगरपरिषद कर्जत - ०२<br>८) नगरपरिषद पेण - ०२<br>९) नगरपरिषद माथेरान - ०१<br>१०) नगरपरिषद मुरुड - ०१<br>११) नगरपरिषद उरण - ०२<br>१२) नगरपंचायत तळा - ०१<br>१३) नगरपंचायत खालापूर - ०१<br>१४) नगरपंचायत माणगांव - ०१<br>१५)नगरपंचायत पोलादपूर - ०१<br>१६) नगरपंचायत म्हसळा - ०१<br>**Total-31** | SC- 03<br>ST- 03<br>VJ-(A)- 01<br>NT (B)- 01<br>NT (C)- 01<br>NT-(D)- 01<br>OBC- 05<br>EWS- 03<br>OPEN-10<br>**Total -28** | B.Sc. Nursing/ GNM with Nursing Council Registration | खुला ३८ व राखीव ४३ (NHM) कार्यरत कर्मचारी ५ वर्ष शिथिल | रु. २०,०००/- प्रति माह | दि. १२/०८/२०२२ |
| 03 | अधिपरीचारीका (Staff Nurse) (पुरुष) | | SC-01<br>VJ-(A)- 01<br>OPEN- 01<br>**Total -3** | | खुला ३८ व राखीव ४३ (NHM) कार्यरत कर्मचारी ५ वर्ष शिथिल | | |
| 04 | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी -पुरुष | १) महानगरपालिका पनवेल - ६<br>२) नगरपरिषद खोपोली - ५<br>३) नगरपरिषद अलिबाग - ०१<br>४) नगरपरिषद महाड - ०२<br>५) नगरपरिषद रोहा - ०२ | SC- 4<br>ST- 3<br>VJ-(A)- 1<br>NT (B)- 1 | 12th pass in Science or equivalent course | खुला ३८ व राखीव ४३ | रु. १८,०००/- प्रति माह | दि. १७/०८/२०२२ |

Scanned with CamScanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ५) नगरपरिषद रोहा - ०२<br>६) नगरपरिषद श्रीवर्धन - ०२<br>७) नगरपरिषद कर्जत - ०२<br>८) नगरपरिषद पेण - ०२<br>९) नगरपरिषद मायेरान - ०१<br>१०) नगरपरिषद मुरुड - ०१<br>११) नगरपरिषद उरण - ०२<br>१२) नगरपंचायत तळा - ०१<br>१३) नगरपंचायत खालापूर - ०१<br>१४) नगरपंचायत माणगांव - ०१<br>१५)नगरपंचायत पोलादपूर - ०१<br>१६) नगरपंचायत म्हसळा - ०१<br>**Total-31** | NT (C)- 1<br>NT-(D)- 1<br>OBC- 6<br>EWS- 3<br>OPEN- 11<br>**Total -31** | passed<br>**AND**<br>Paramedical Basic training Course<br>**Or**<br>Sanitary Inspector Course (Government Recognized Institute) | (NHM)<br>कार्यरत कर्मचारी<br>५ वर्ष शिथिल | | |

अटी व शर्ती :-

१) अ.क्र ०१ व ०४ या पदांकरिता इच्छुक उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज १) वयाचा पुरावा २) पदवी/पदविका प्रमाणपत्र (सर्व वर्षांचे प्रमाणपत्र) ३) गुणपत्रिका (सर्व वर्षांचे गुणपत्रिका) ४) कौन्सील रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (As Applicable) ५) शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे / NHM मधील कामाचा अनुभव प्रमाणपत्र कागदपत्रे ६) जात / वैधता प्रमाणपत्र इ.छायांकित प्रतींसह वर नमुद तक्त्यातील पदासमोर नमुद केलेल्या दिवशी (दिनांकानुसार) सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत ४ था मजला, राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, शिवतीर्थ, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग येथे प्रत्यक्षात (By Hand) सादर करणेचे आहेत. त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

२) पद क्र.४ करिता राज्यस्तरीय मार्गदर्शनानुसार पुढील निकष लागू आहेत.

अ) उमेदवाराचे वय १८ पेक्षा कमी नसावे.

ब) उमेदवाराने विज्ञान शाखेतून उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा शासनाने तिच्याशी समतुल्य घोषित केलेली इतर कोणतीही परिक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

क) उमेदवार विभागाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र किंवा सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर यांच्याकडून आरोग्य कर्मचारी पदासाठी निश्चित केलेला निमवैद्यकिय मुलभूत प्रशिक्षण अभ्यासक्रम किंवा आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक (Sanitary Inspector) किंवा महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक (Sanitary Inspector) किंवा समकक्ष अभ्यासक्रम पुर्ण करुन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३) पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

४) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २५ एप्रिल २०१६ चे शासन निर्णयास अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय करीता ४३ वर्षे राहील. रुग्ण सेवेशी संबंधित इतर पदांची वयोमर्यादा ६५ वर्ष राहील. वयाच्या ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडुन प्राप्त केलेले शारीरीकदृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

५) लहान कुटुंबाची अट दि.२३/०७/२०२० पासून लागु करण्यात आली असून दि.२३/०७/२०२० पासून दोनपेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत.

Scanned with CamScanner

६) वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असुन, त्यांचा कालावधी ११ महिने किंवा त्यापेक्षा कमी कालावधीसाठी भरण्यात येणार आहेत अथवा त्या आधी मंजुरी न मिळाल्यास पदे कधीही समाप्त करण्यात येतील.

७) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकीय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही. तसेच यापदासाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत.

८) केंद्र / राज्य शासनाने संबंधित पदे नामंजुर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

९) अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द् कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१०) उमेदवारांनी अर्ज करीत असलेल्या पदांचे नाव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करावा. जर मागासवर्गीय उमेदवारांनी अर्ज आरक्षणामधून सादर केलेला असेल, परंतु सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास, उमेदवारांचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

११) राखीव संवर्गातून अर्ज करणा-या उमेदवारांनी त्या संवर्गाचे जात प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. जातीचे प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. अशा उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभही घेता येणार नाही.

१२) सहसंचालक (अतांत्रिक) रा.आ.अ. मुंबई यांचे क्र. राआसो/ मनुष्यबळ/ आरक्षण /२४५६४-७७४/१६ दि. २०.०७.२०१६ रोजीच्या पत्रानुसार आवश्यक असणाऱ्या आरक्षित संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या इतर संवर्गातील उमेदवारांचा गुणवत्तेनुसार विचार करण्यात येईल.

१३) स्टाफ नर्स, वैद्यकीय अधिकारी, इत्यादी पदांकरीता तत्सम कौन्सिलकडील वैध नोंदणी प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. कौन्सिल कडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालू कालावधीतील असावी. तथापी वैध्य प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल

१४) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झालेनंतर भविष्यात जर एखादया ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस गुणानुक्रमे पूर्ण यादीतील मेरिटमधील पुढील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न राबवता नियमानुसार नियुक्ती आदेश दिले जातील. सदर निवड यादी पुढील ११ महिन्यापर्यंत अथवा राज्यस्तरीय सुचनांनुसार वैध राहील.

१५) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१६) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांच्या सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचूक नोंदवावा तसेच ते भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

१७) भरती प्रक्रिये दरम्यान ज्या-ज्या उमेदवारांना बोलविण्यात येईल, त्या-त्या वेळी त्यांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१८) तसेच सदर उपस्थितीकरीता कोणतेही मानधन अथवा प्रवास खर्च देय राहणार नाही.

Scanned with CamScanner

१९) सोबत अर्जाचा नमुना हा https://zpraigad.maharashtra.gov.in व https://raigad.gov.in या संकेतस्थळावर जाहीरातीसोबत प्रसिध्द करण्यात येत आहे.

२०) सदरहू भरती प्रक्रियेकरीता मुलाखत प्रक्रिया, निवड यादी प्रसिध्द करणे, हरकती/आक्षेप प्राप्त करुन घेणे व त्या निकाली काढणे आदी रितसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानाकडिल प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार भरतीप्रक्रिया पार पाडून निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे इ. बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी https://zpraigad.maharashtra.gov.in व https://raigad.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. सदर विषयी कार्यालयात विचारणा करण्यात येऊ नये. केवळ शासकीय, निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणा-या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल. खाजगी, स्वयंसेवी संस्था, बाह्य यंत्रणाद्वारे कार्यरत पदावर कामाचा अनुभवाचा विचार करणेत येणार नाही. समकक्ष कामाचा अनुभव ग्राह्य धरणेत येईल. तसेच अनुभव प्रमाणपत्र सादर करताना, संस्था प्रमुखाची स्वाक्षरी संस्थेचे लेटर हेड, जावक क्र व अनुभव कालावधीचा स्वयंस्पष्ट उल्लेख करणे गरजेचे आहे, नसल्यास अनुभव प्रमाणपत्र ग्राह्य धरणेत येणार नाही. नियुक्तीच्या आदेशाच्या आधारे गुण दिले जाणार नाहीत.

२१) नियुक्ती आदेश देण्यापूर्वी सर्व मूळ आवश्यक प्रमाणपत्रे, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे इतर आवश्यक कागदपत्रे याची तपासणी व खात्री करण्यात येईल कागदपत्राची पुर्तता न केलेस कोणत्याही उमेदवाराचा अर्ज कोणत्याही स्तरावर बाद करणेत येईल व गुणांकनामध्ये ही बदल करणेत येईल.

२२) जे उमेदवार क्र.१ ते ४ मध्ये नमुद पदाची शैक्षणिक अर्हतेची तसेच इतर आवश्यक अर्हतेची पूर्तता करणार नाहीत त्यांना तात्काळ अपात्र ठरविणेत येईल.

२३) उमेदवाराचा अर्ज अपुर्ण व अर्धवट भरलेला असल्यास नाकारला गेल्यास सर्वस्वी जबाबदारी ही उमेदवारांची राहील याबाबत उमेदवारांना तक्रार करता येणार नाही

२४) निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजू होताना सादर करावा लागेल

२५) निवड झालेल्या उमेदवारांना (UHWC) नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र कार्यान्वित झाल्यानंतर नियुक्ती आदेश देण्यात येतील. तसेच नियुक्ती आदेश दिल्यानंतर ७ दिवसाच्या आत नियुक्तीचे ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील

२६) अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना पदस्थापना रुग्णसेवेच्या आवश्यकतेनुसार देण्यात येईल. याबाबत उमेदवाराने कोणत्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रदद करणेत येईल.

२७) अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपुष्टात आणून, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल.

२८) भरती प्रक्रियेत पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे, पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणे, इत्यादी सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असून निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकारी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांनी राखुन ठेवलेले आहेत.

२९) कोविड-१९ साथ उद्रेक परिस्थितीस अनुसरुन मास्क व सॅनिटायझरचा वापर करावा व सामाजिक अंतराचे नियम पाळणे बंधनकारक आहे.

Scanned with CamScanner

३०) वैदयकिय अधिकारी (MBBS) या पदाकरिता सदर भरतीप्रकियेत उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्रत्येक महिन्याच्या १ व १५ तारखेस थेट मुलाखतीद्वारे निवड प्रक्रिया करण्यात येईल. तसेच सदर दिवशी शासकिय सुट्टी असल्यास दुसऱ्या दिवशी थेट मुलाखतीद्वारे निवड प्रकिया करण्यात येईल.

दिनांक :-२७/०७/२०२२
ठिकाण :- अलिबाग

सदस्य सचिव
निवड समिती
तथा,
जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

डॉ.किरण पाटील, (भा.प्र.से.)
अध्यक्ष,निवड समिती
तथा,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.

Scanned with CamScanner

**निवड प्रक्रिया :-**

पात्र उमेदवारांना पुढील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे गुण देण्यात येणार आहेत.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक (Qualifying Exam) मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणाच्या टक्केवारीचे ६० प्रमाणे प्रॅप्रोशन काढावे. (उदा. ६० टक्के गुण प्राप्त असल्यास त्याचे ६० प्रमाणे Propotion =६०*६०/१००=३६ | ६० गुण |
| पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी.) | अधिकतम १० गुण दयावेत. (उदा. एमबीबीएस पदासाठी MD/MS उमेदवाराने अर्ज केला असल्सास त्यास १० गुण दिले जातील.) | १० गुण |
| शासकीय व निमशासकीय अनुभव असल्यास (किमान अनुभव ०६ महिने) | प्रत्येक १ वर्षासाठी ४ गुण दयावेत. (६ महिन्यांसाठी ०२ गुण ) फक्त शासकीय संस्था विभाग शासन अंगीकृत संस्था यांचाच अनुभव ग्राहय धरणेत येईल. | २० गुण |
| संबधित पदासाठी पात्र उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखतीसाठी | निवड समिती अध्यक्ष तसेच निवड समिती सदस्य यांनी पात्र उमेदवारांच्या मुलाखती दरम्यान दिलेले गुण | १० गुण |

Scanned with CamScanner

| Application No. : (Office Use only) | |
|---|---|

## 15th FINANCE COMMISSION
**DISTRICT INTEGRATED & FAMILY WELFARE SOCETY THANE**
Year 2022-23 (Advertisement No.1/2022/ Publish Daily Date - / /2022
**CONTRACTUAL RECRUITMENT - Application Form**

PHOTO

**Applying Post Name :-**

(All fields in the forms are mandatory to be filled an Incomplete form submitted will be treated as rejected)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Name: | | | | |
| Father's/Husband's Name: | | | | |
| Date of Birth- | | | Blood Group: | Gender: |
| DD | MM | YYYY | | Marital status : |
| Age - | | | | |
| Marital status : | | | Existing NHM Employee (Yes/ No) | Nationality: |
| Original Category : | | | Applying for Category: | Caste Certificate Attached : Yes/No |

Address/Contact Details: (Name of the District and Pin code is compulsory)

| |
|---|
| Address:<br>State<br>Pin:<br>Contact No: |
| E-Mail Id Correspondence: |

Scanned with CamScanner

Academic /Professional Educational all summary: (Starting form most recent)

| From (MM/YY) | TO (MM/YY) | Degree/ Diploma | University/ Institute | Specialization/ Subjects | Final Year Total Marks & Obtained Marks | Final Year Percentage ( %) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**(OFFICE USE ONLY)**

**Remark :-**________________________________________

**Name of Authority:-**____________________ **Signature of Authority:-**__________________

Work/Experience Summary :( Starting form current/most recent) Experience :

| Sr. No | Form (MM/YY) | To (MM/YY | Organization | Designation | Responsibilities (Min.30 & Max.50 Words) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| **Total Experience** (In Years & Months): | | | | Relevant Experience to the post applied (In Years & Months): | |
| **Computer Proficiency:** | | | | | |
| **Typing Skill :** Marathi Typing 30 wpm (Yes/No) : | | | | | |
| English Typing 40 wpm (Yes/No) : | | | | | |
| **Demand Draft No.:** | | | **Date:-** / / | **Bank Name :** | |

**Preferences for Place of Posting : 1)** ..............................

**2)** ..............................

**3)** ..............................

Scanned with CamScanner

Declaration:

I hereby declare that all statements made in the application are true, Complete and correct to the best of my knowledge and belief. I understand that in the event of any information being found untrue/false/incorrect or I do satisfy the eligibility criteria my candidature will be cancelled, without assigning any reason thereof. I have read the content of the advertisement and agree to abide by the rules, regulations and procedures for appointment to the post applied for.

Name:

Place:

Date :

Signature :

**Disclaimer:**
**The applicants are required to submit the full filled application on the day of walk in Interview**

Checklist for documents to be submitted :

1) Full filled Application form in the prescribed format.
2) For MO/SN/Pharmacist Valid registration certificate.(As Applicable) If not renewed, renewal receipt.
3) For age Proof – School Leaving Certificate/ 10th Passing Certificate / Domicile Certificate
4) Diploma, Degree & Master Degree – Only submit Last Year Certificate and Marksheet
5) If any post-graduation, Post-graduation certificate
6) Experience – Experience certificate as per mention in the form
7) Computer Proficiency - MS- CIT/ DOEACC Course- for the Post if applicable.

Scanned with CamScanner

# प्रतिज्ञापत्र
## नमुना अ

मी. श्री./श्रीमती/ कुमारी ..........................................................
श्री............................................................यांचा/यांचीमुलगा/मुलगी/पत्नी
वय ......... वर्ष, राहणार ,.......................................................
याद्वारे असे जाहिर करतो/करते की,

(१) मी ........................................................ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ..................... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै, २०२१ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या .. ...आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा.)

(३) दिनांक २३ जुलै, २०२१ रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै, २०२१ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

सही/-

दिनांक :-

Scanned with CamScanner